BMM Pahili 2024 Tondi pariksha

# Reading Comprehension

## फुलपाखरु

सीमा बागेत खेळत होती. तिला फुले खूप आवडतात. ती बागेतली फुले वेचू लागली. तिला अचानक फुलपाखरु दिसले. ते फुलावर जाऊन बसले. सीमाला खूप मजा वाटली. ती फुलपाखरु पकडायला गेली तर फुलपाखरु उडून गेले. सीमाला वाईट वाटले.

प्रश्न १: सीमा कुठे खेळत होती?
प्रश्न २: सीमाला काय आवडते?
प्रश्न ३: सीमाला काय दिसले?
प्रश्न ४: तिने काय केले?
प्रश्न ५: तुम्हाला फुलपाखरु दिसले तर काय करता?

Reading Comprehension

## भातुकली

आजीने मनुला बाहुली आणली. बाहुली साठी छान छान कपडे आणले. मनुला बाहुली खूपच आवडली. ती रोज आजीबरोबर भातुकली खेळायची. मग मनु आणि आजी बाहुलीचे कपडे बदलत. छान छान खाऊ आजी देत असे.  तो खात मनुने सूटी मजेत घालवली.

प्रश्न १:मनुला बाहुली कोणी दिली?
प्रश्न २:आजीने बाहुलीसाठी आणखी काय दिले ?
प्रश्न ३: मनु बरोबर भातुकली कोण खेळायचे?
प्रश्न ४:मनु कोणाचे कपडे बदलायची?
प्रश्न ५:तुमचे आवडते खेळ कोणते?

Listening Comprehension

## सुचना

आई बाबा मला सारखे खेळणी आवरायला सांगतात. कधी कधी मला खूप राग येतो. सारखे काय तेच तेच सांगायचे. मग मी तिकडे लक्षच देत नाही. पण एक दिवस मला माझी चूक कळली. तो सबंध दिवस मला जेवायला मिळाले नाही. नेहमीसारखे आई मला सकाळी सांगत होती की डबा खोलीत टेबलावर ठेवला आहे. आठवणीने ने. पण मी आईकडे लक्ष दिले नाही. शाळेत डबा खावा तर डबाच नाही. मला माझी चूक कळली. आई नि बाबा काही उगाच नाही सांगत. आता मी आईची सुचना नेहमी ऐकतो.

प्रश्न १: मला आईबाबा काय सांगतात?

प्रश्न २: आईने काय सांगितले होते?

प्रश्न ३: मी आईचे ऐकले का?

प्रश्न ४: मी काय विसरलो होतो?

प्रश्न ५: आता मी कसा वागतो?

Listening Comprehension

# आजोबा

रमेशचे आजोबा थकलेले दिसतात. काही दिवसांपासून नीट दिसत नाही. रमेश आजोबांची खूप काळजी घेतो. वेळेवर औषध देतो. हाताला धरुन घरातच फिरावतो. पेपर वाचून दाखवतो. शाळेत घडलेली गंमत सांगतो. गृहपाठ करतांना आजोबा मदत करतात. ते छान छान गोष्टी सांगतात. रमेशला गोष्टी आवडतात. आजोबा आराम करतात तेव्हा रमेश खेळायला बाहेर जातो.

प्रश्न १: रमेश कोणाची काळजी घेतो?

प्रश्न २: रमेश कोणती मदत आजोबांना करते?

प्रश्न ३: गृहपाठ करतांना कोण मदत करतात?

प्रश्न ४ : रमेश खेळायला बाहेर कधी जातो?

प्रश्न ५: तुम्ही आजोबांना काय मदत करता?